राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मापदंडानूसार भौगोलिक क्षेत्राच्या 33 टक्के क्षेत्रावर वृक्षाच्छादन / वनीकरण असणे आवश्यक आहे. प्रगतीशील महाराष्ट्रात आज रोजी वृक्षआवरणाचे प्रमाण सर्व साधारणपणे 20% आहे. **"हरीत महाराष्ट्र"** या संकल्पनेसाठी आणि हवामानाबद्दल, अवकाळी पाऊस, दुष्काळ, पाणीटंचाई अशा समस्यांवर मात करण्यासाठी, राज्यामध्ये विविध विकास योजना व कार्यक्रम राबविले जात आहेत.

वर्धा जिल्ह्यामध्ये सन 2017 पासूनच्या 50 कोटी वृक्षारोपण उद्दिष्टांतर्गत विविध वृक्षलागवड कार्यक्रमांबरोबर **"ऑक्सीजन पार्क"** हा महत्वाकांक्षी कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

## ऑक्सीजन पार्कची ठळक वैशिष्टये

| | | |
|---|---|---|
| ऑक्सीजन पार्कचे एकूण क्षेत्रफळ | - | 155.30 हे.आर. |
| लागवडी योग्य आराजी | - | 60.42 हे.आर. |
| लावण्यात आलेल्या झाडांची संख्या | - | 32475 |
| जिवंत वृक्षांची संख्या व जिवंत वृक्षांची टक्केवारी | - | 32341, 93.43% |
| निर्मित झालेले मनुष्य दिवस (सन2018) | - | 21373 |
| जिवंत वृक्षांच्या प्रजाती | - | सिताफळ, चिंच, कडूनिंब, सिसम, गुलमोहर, शेमल, करंज, कॅशिया, वड, महारुक, ऑस्टेलियन बाभूळ, पिंपळ, जांभूळ, आवळा, शेवगा |

## फायदे

1) मग्रारोहयो अंतर्गत ऑक्सीजन पार्क उभारल्यामूळे एकंदरितच मजुरांना काम मिळाले.
2) एकूण 32341 झाडांची लागवड झालेल्या झाडांमूळे परिसराचे वातावरण संतुलन योग्य राखण्यास मदत.
3) "ऑक्सीजन पार्कस" ही आरोग्यदायी मनोरंजनाचे ठिकाण म्हणून लोकांच्या पसंतीस उतरत आहेत.
4) शुध्द, स्वच्छ व मोकळया हवेमूळे ग्रामीण लोकांच्या आरोग्यात सुधारणा.
5) झाडांचे महत्व शाळेतील विद्यार्थी, इतर नागरिकांना समजवून देऊन हरीत ज्ञानप्रसार व लोकजागृती होण्यात हातभार.
6) मोकळया माळरानावर फुललेल्या हिरव्या सृष्टीमूळे गावांच्या सौदर्यात भर
7) भविष्यात या झाडांमूळे तापमानबदल, पर्जन्यदुर्भिक्ष्य, हवा प्रदूषण, मातीची धूप यासारखे प्रश्न सोडविण्यास मदत.

एकूण 26 ऑक्सीजन पार्क्स ही वर्धा जिल्हयाची हरीत फुफ्फुसे म्हणून काम करत आहेत. लोकसहभाग आणि सामाजिक उत्तरदायित्व जोपासतांना आज झालेली वृक्षलागवड ही शाश्वत संपत्ती निर्माण झाली आहे. लावलेली झाडे जगवतांना लोकांमधील निसर्गप्रेम व सामाजिक जाणीव वृदिध्ंगत होत आहे.

भविष्यात देखील अशाच प्रकारे आणखी ऑक्सीजन पार्क्स वाढवून वर्ध्याला **"हरीत वर्धा"** बनवण्याचे प्रयत्न असल्यास वर्धा जिल्हा प्रशासनाचा मानस असणार आहे.